# सुप्रिया कुसाळेचे यश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय संशोधन स्पर्धेमध्ये राजाराम महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाची पीएच.डी. विद्यार्थिनी सुप्रिया प्रकाश कुसाळे (वळिवडे) यांनी संशोधित केलेल्या सेंद्रिय खतास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. त्यांनी पर्यावरणपूर्वक, किफायती फायटेज तयार करण्याची क्षमता असलेले जैविक खत तयार केले आहे. गेले तीन वर्षे सुरू असलेल्या या संशोधनात या खतामुळे ऊस, मका, मिरची, आले, हळद, ज्वारी, व भात या पिकांची गुणवत्ता वाढण्यासोबतच मातीची सुपीकतादेखील वाढल्याचे दिसून आले. जानेवारी महिन्यात मुंबई येथे झालेल्या आंतरविद्यापीठ संशोधन स्पर्धा आविष्कारमध्येही सुप्रिया यांच्या संशोधनास प्रथम क्रमांक मिळाला होता. या संशोधनासाठी सुप्रियाला राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अण्णासाहेब खेमनार, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. यास्मिन अत्तार, तसेच विभागातील प्रा. शोभना भोसले व प्रा. शहनाज फारुकी यांचे मार्गदर्शन लाभले.

# बी.ए., बी.एस्सी., एम.एस्सी. परीक्षांसाठी २३३ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शुक्रवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. ३८३ विद्यार्थ्यपैकी २३३ विद्यार्थी उपस्थित होते.

अंतिम वर्ष शेवट सत्राच्या परीक्षा काही कारणास्तव ज्या विद्यार्थ्यांना देता आल्या नाहीत, अशा विद्यार्थ्यांच्या पुनर्परीक्षा विद्यापीठाने १७ डिसेंबर पासून सुरू झाल्या आहेत. परीक्षा चार सत्रांमध्ये ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत आहेत. शुक्रवारी बी.ई., बी.एस्सी., एम.एस्सी., बी.ए., एम.ए., बी.फार्म बी.सी.ए., बी.बी.ए., बी.कॉम., एम.कॉम., लॉ (पाच वर्षे), बी. एड., बी. ए. बी.एड., एम.ए.एम.एस्सी. (भूगोल), एम. बी.ए., एमबीए - (डिस्टन्स मोड), अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# अंतिम सत्रातील २३३ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध १७ अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षातील २३३ विद्यार्थ्यांनी शुक्रवारी परीक्षा दिली. चार सत्रांमध्ये ऑनलाईन पद्धतीने परीक्षा झाली. त्यासाठी एकूण ३८३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अंतिम वर्ष, सत्राच्या परीक्षा घेतल्या होत्या. काही कारणास्तव या विद्यार्थ्यांना त्या परीक्षा देता आल्या नाहीत.

अशा विद्यार्थ्यांची पुनर्परीक्षा गुरुवारपासून सुरू झाल्या. शुक्रवारी दिवसभरात बी.ई., बी.एस्सी., एम.एसी., बी.ए., एम.ए., बी.फार्म., बीसीए., बीबीए., बी.कॉम., एम.कॉम., लॉ., बी.एड., बीएबीएड., एम.ए., एम.एस्सी (भूगोल)., एमबीए., एमबीए (एक्झिक्युटिव्ह डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. त्यासाठी उपस्थित असणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ६०.८३ इतकी होती.

# विद्यापीठ करणार संस्कृती संवर्धन

## शाहू लोकसंस्कृती अभ्यास केंद्राची स्थापना : कुलगुरु डॉ.शिर्के यांची माहिती

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यातील लोकविद्या आणि लोकसंस्कृती जागतिक पातळीवर पोहचविण्याचा प्रयत्न विद्यापीठाकडून सुरु आहे. ज्या–त्या भागातील महाविद्यालयांकडून तेथील लोकसंस्कृती डिजीटल स्वरुपात संकलित केली जाणार आहे. हे ऑडिओ, व्हीडीओ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करुन कोल्हापूर, सांगली, साताराची लोकविद्या आणि लोकसंस्कृती जगभर पोहचविणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. यासाठी राजर्षी शाहू लोकविद्या, लोकसंस्कृती अभ्यास केंद्र स्थापन केल्याचेही डॉ. शिर्के यांनी सांगितले.

डॉ. शिर्के म्हणाले, कोल्हापूर, सांगली, सातारा हे तीन जिल्हे भौगोलिकदृष्ट्या सुपीक व समृद्ध आहे. या तीन जिल्ह्यांमध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांवर आधारीत उद्योग व्यवसायांचा या क्षेत्रात विकास झाला. त्यामुळे अनेक लोक या तीन जिल्ह्यामंध्ये स्थलांतरीत होवून स्थिरस्थावर झाले. या प्रदेशातील मूळचे शेतकरी, बलुतेदार, अलुतेदार, पारंपरिक व्यवसायिक, फिरस्ते आणि भटके यांनी मिळून येथील सांस्कृतिक जीवन समृद्ध केले. यामधुन येथील लोकजीवन घडत गेले. येथील समाजाचे परंपरागत ज्ञानसंचित, त्यांची कलाकौशल्ये, व्यावसायिक ज्ञान, लोककला या गोष्टींचा अभ्यास करणे, संवर्धन करणे, व्यावसायिक ज्ञान आणि कौशल्ये नव्या पिढीकडे हस्तांतरीत करणे, त्यांच्या कलागुणांना वाव देणे, अशा अनेक उद्देशाने अभ्यास केंद्र स्थापन केल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

### शिवाजी विद्यापीठाचा कराडच्या कृष्ण इन्स्टिट्यूटसोबत करार...

कराड येथील कृष्णा इंन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस समवेत शिवाजी विद्यापीठाने गुरुवारी सामंजस्य करार केला. करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक विद्यार्थी व विद्यार्थी यांच्यामध्ये संशोधकीय सहकार्य निर्माण होणार आहे. विद्यापीठातील एमएस्सी इन मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधांची उपलब्धता होणार आहे. यामध्ये न्युरोसायन्स, कर्करोग संशोधन आदी विषयक संशोधन करता येईल. त्याचप्रमाणे कृष्णा इंस्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांना बायोइन्फॉर्मेटिक्स, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, फार्मास्युटिकर मायक्रोबायॉलॉजी, बायोकेमिस्ट्री, पश्चिम घाटातील जैवविविधत तसेच सामाजिक शास्त्रांमधीलही वैद्यकीय क्षेत्राला पूरक अशा क्षेत्रांबाबत अभ्यास करणे शक्य होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी दिली.



**कोल्हापूर : पंचगंगा स्मशानभूमीस ५ हजार रूपयांचा धनादेश अध्यक्ष जनार्धन सुरकुले.**

# विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेतर्फे स्मशानभूमीस मदतीचा धनादेश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थेतर्फे पंचगंगा स्मशानभूमीस ५ हजार रूपयांचा धनादेश मदत म्हणून देण्यात आला. महापालिका आरोग्य निरिक्षक महेश भोसले, माहिती शिक्षण व संवाद अधिकारी नीलेश पोतदार यांच्याकडे धनादेश सुपुर्द करण्यात आला. पतसंस्थेतर्फे दिवाळी भेट कार्ड दिले जाते. यंदा कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भेटकार्डची छपाई न करता हा खर्च स्मशानभूमीस देण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष जनार्धन सुरकुले, चिटणीस नितीन लोहार, संचालिका सुनिता वांगिकर, सुनिता धुमाळ उपस्थित होत्या.

### न्यूरोसायन्स, कर्करोगासह अन्य क्षेत्रात एकत्रित कार्य

# ‘कृष्णा’-शिवाजी विद्यापीठात संशोधन कार्याचा सामंजस्य करार

लोकसत्ता वार्ताहर

**कराड :** कृष्णा वैद्यकीय विज्ञान अभिमत विद्यापीठ आणि कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाबाबत सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत दोन्ही विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक व कर्मचारी एकत्रितपणे न्यूरोसायन्स (मन आणि मेंदूशास्त्र), कर्करोगासह अन्य वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन कार्यात सहभागी होतील.

कृष्णा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत ‘कृष्णा’चे कुलसचिव डॉ. एम. व्ही. घोरपडे आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी या सामंजस्य करारावर कराड येथे विशेष कार्यक्रमात स्वाक्षऱ्या केल्या.

शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, समन्वयक प्रा. डॉ. के. डी. सोनवणे, कृष्णा विद्यापीठाचे डॉ. अतुल भोसले, अतिरिक्त संशोधन संचालक डॉ. डी. के. अगरवाल, समन्वयक डॉ. सतीश काकडे, धीरज माने आदींची या वेळी उपस्थिती होती.

डॉ. सुरेश भोसले म्हणाले, की शिवाजी विद्यापीठासमवेत होत असलेला हा सामंजस्य करार दूरगामी आहे.



कृष्णा अभिमत विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये सामंजस्य कराराप्रसंगी डॉ. सुरेश भोसले, डॉ. अतुल भोसले, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील व अन्य.

या माध्यमातून दोन्ही संस्थांमध्ये सहकार्याची आणखी नवनवीन क्षेत्रे उघडली जातील. हे सहकार्य अखंडित राहील. या करारानुसार दोन्ही विद्यापीठांमध्ये विविध शैक्षणिक व संशोधकीय उपक्रम, संयुक्त प्रकाशने, माहितीची देवाण-घेवाण, ग्रंथालयीन सहकार्य होईल. या करारामुळे शिवाजी विद्यापीठातील एम.एस्सी. इन मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधांची उपलब्धता होईल. कृष्णा अभिमत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनाही बायोइन्फॉर्मेटिक्स, मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, फार्मास्युटिकल मायक्रोबायोलॉजी, बायोकेमिस्ट्री, पश्चिम घाटातील जैवविविधता, सामाजिक शास्त्रांमधील वैद्यकीय क्षेत्राला पूरक अशा बाबींचा अभ्यास व संशोधन करता येणार असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. तृप्ती भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. डी. के. अग्रवाल यांनी आभार मानले.

# वैकुंठ मेहता संस्थेसोबत करार सहकाराला बळ देणारा

## डॉ. डी. टी. शिर्के : संशोधनाचा दोन्ही संस्थाना होणार लाभ

कोल्हापूर, ता. १८ : " सहकार विषयक संशोधनात राष्ट्रीयस्तरावर लौकिक असलेल्या वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थे(VAMNICOM) सोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील सहकारी चळवळीतील संशोधन कार्याला मोठे पाठबळ लाभेल." असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

येथील शिवाजी विद्यापीठात आज सायंकाळी वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेसोबत विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला. या प्रसंगी ते बोलत होते. 'वाम्निकॉम'चे संचालक डॉ. के. के. त्रिपाठी, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एम. एस. देशमुख,



'वाम्निकॉम'च्या सेंटर ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे डॉ. यशवंत पाटील उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले," या करारामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील सहकारी चळवळीचा विविधांगी संशोधनात्मक वेध घेता येईल."

डॉ. त्रिपाठी म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात सहकार चळवळ समृद्ध आहे. येथील सहकार भारतातच नव्हे, तर आशियातील सर्वाधिक यशस्वी मॉडेल आहे. सहकार आणि कॉर्पोरेट दोन क्षेत्रांमध्ये संघर्षाचे वातावरण आहे. या परिस्थितीत संशोधन क्षेत्रांची नव्याने निश्चिती करावी लागेल. त्यासाठी संयुक्तपणे आंतरराष्ट्रीय कार्यक्रम निर्धारित करावे लागतील. त्या दृष्टीने हा सामंजस्य करार दोन्ही संस्थांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे."

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वैशाली भोसले यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, डॉ. विशाल ओव्हाळ, डॉ. नीलम जाधव, डॉ. सागर वाळवेकर आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाचा वैकुंठ मेहता संस्थेशी सामंजस्य करार

## प्रशिक्षण कार्यक्रम राबविणार : सहकार चळवळीच्या संशोधनाला पाठबळ

▪ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन (वाम्निकॉम) यांच्यात शुक्रवारी सामंजस्य करार झाला. याअंतर्गत विद्यापीठ परिक्षेत्रातील सहकारी चळवळीचा विविधांगी संशोधनात्मक वेध घेतला जाणार आहे.

या सामंजस्य करारामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातील सहकारी चळवळीच्या अनुषंगाने संशोधन कार्याला मोठे पाठबळ लाभणार आहे. शिक्षक-विद्यार्थी एक्स्चेंज, प्रशिक्षण कार्यक्रम, संयुक्त संशोधन प्रकल्पांची निर्मिती, समाजकेंद्री संशोधन प्रकल्प, सहकारविषयक आंतरराष्ट्रीय कार्यक्रम हाती घेणे शक्य होणार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. यावेळी सामंजस्य करारावर विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी तर 'वाम्निकॉम'चे संचालक डॉ. के. के. त्रिपाठी यांनी स्वाक्षरी केल्या.



**शिवाजी विद्यापीठ आणि 'वाम्निकॉम' यांच्यात शुक्रवारी झालेल्या सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतरण कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. के. के. त्रिपाठी यांनी केले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.**

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ.एम. एस. देशमुख, 'वाम्निकॉम'च्या सेंटर ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे डॉ. यशवंत पाटील, डॉ. प्रकाश पवार, डॉ. वैशाली डॉ. कविता वड्राळे, संतोष सुतार, गजानन साळुंखे, चेतन गळगे,भोसले परशुराम वडार, सागर वाळवेकर, आदी उपस्थित होते.